Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# मताधिकार आणि मानवाधिकारासंबधी राष्ट्रसंतांचे विचार

**डॉ. गणेश चव्हाण**
मराठी विभागप्रमुख
संत गाडगे महाराज महाविद्यालय
हिंगणा जि. नागपूर — ४४१११०
मोबा. नं. ९८५०३२४२९८
ई—मेल ganeshchavhan1971@gmail.com

---

**प्रस्तावना —**

निसर्गाने मानवाला दिलेले हक्क किंवा मानवाधिकार हेच मानवाचे मूलभूत हक्क आहे. मानवी हक्क हे जागतिक असून कुठल्याही लोकशाही राष्ट्रात ते सर्वांसाठी समान असते असे हे हक्क उपजत असून कायदेशीर असू शकतात. जसे सर्व प्रौढ माणसांना कायद्याने मिळालेले मतदानाधिकार हे सुद्धा मानवाधिकार आहे. प्रत्येक भारतीय प्रौढ मतदारांना मतदानाचा समान व कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. ते कुणीच त्याच्याकडून हिरावून घेऊ शकत नाही. या संदर्भात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत विस्तृत असे विवेचन केले आहे. आज इतक्या वर्षानंतरही ते तितकेच उपयुक्त ठरतात.

**ग्रामगीतेतील मताधिकार —**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' ही ग्रामविकासाची 'माता' आहे. तशीच ती मानवाधिकाराची 'जननी' पण आहे. ग्रामगीतेतील विचारानुसार ग्राम हे प्रबल असे राष्ट्र होऊ शकते. त्यासाठी त्यांनी लोकशाहीचा आणि मानवाधिकाराचा स्वीकार केला आहे. त्यामागचे खरे कारण म्हणजे भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेमध्ये स्वतंत्रता, समता आणि एकता यांचा स्वीकार केल्यास लोकशाही अधिक मजबूत व बळकट होऊ शकते, असे जे विचार व्यक्त केले होते त्याच विचारांचा स्वीकार राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत केल्याचे दिसून येते.

स्वतंत्रता असेल पण समता नसेल तर असमानता निर्माण होईल. समाजासमाजात वर्ण—वर्ग वाद, भांडवलशाही, कामगाराचे, कष्टकऱ्यांचे, दुबळ्यांचे अन् गरिबांचे शोषण झाल्याशिवाय काही राहणार नाही. आणि त्यांना त्यांचे मत मांडण्याचा, भाष्य करण्याचा अधिकारही राहणार नाही. त्याउलट समता आहे, स्वातंत्र्य आहे परंतु एकता नसेल तर राष्ट्राच्या मजबूतीचा प्रश्न निर्माण होईल. कच्चा पायावर बांधलेली इमारत कधीच दीर्घकाळ टिकू शकत नाही. म्हणून राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत आवर्जुन हाच विचार पदोपदी मांडलेला आहे. त्यांच्या समोर ग्रामाचा, ग्रामनाथांच्या विकासाचा, उत्कर्षाचा आणि समस्त मानवजातीच्या मानवाधिकाराचा विचार होता. ग्रामसमाज व्यवस्था ही मजबूत ग्रामसंघटनेवर उभी राहणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटना कशी असावी या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात—

**यासाठीच आधी सेवाभावी। लेकांचीच संघटना व्हावी।**
**तेथे रीघचि नसावी। अन्य कोणासि।।**
**गावातील एकेक सज्जन। शोधूनि घ्यावे त्यासि जोडून।**
**सेवाभावी मंडळचि संपूर्ण। तयार करावे प्रयत्ने।।**

गावातील सज्जन प्रवृत्तीच्या लोकांना शोधून त्यांना एकत्र आणून सेवाभावी संघटनेची निर्मिती करावी. या संघटनेत सात्त्विक प्रवृत्तीचे लोक असल्यास त्यांना विरोध करणारे लोकं त्यांच्यासमोर टिकणार नाही. म्हणजेच सत्कार्यास विघ्न आणणारे लोकं आपोआपच दूर झाल्याशिाय काही राहणार नाही. असे झाल्यानंतर —

**सेवा संघटनेचा प्रमुख। तो निवडोनि देता चोख।**
**हळूहळू गाव होईल सुरेख। सर्वतोपरी ।।**

सेवाभावी संघटनेतून एकाची प्रमुख म्हणून निवडून दिल्यास गावाचा सर्वांगीण विकास आपोआपच होईल.

स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर संपूर्ण प्रौढ भारतीयांना मिळालेला मानवाधिकार म्हणजे मतदानाचा अधिकार होय. परंतु आपण आपले मताधिकाराचा वापर कशा पद्धतीने केला पाहिजे या संदर्भात आपले विचार व्यक्त करतांना आणि लोकशाहीत प्रतिनिधीची निवडीच्या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्पष्टपणे म्हणतात—

**निवडणुकीची चालू प्रथा। हीच मुळी सदोष पाहता।**
**म्हणेनि योग्य दृष्टी द्यावी समस्ता। गाववासियां।।**

निवडणुकीच्या वेळी गावकरी सध्याच्या मतदानाच्या सदोष प्रथेमुळे खरा—खोटा न पाहता लोभापायी कोणालाही निवडून देतात. परंतु असे न करता आपल्या जीवनाचे सर्व भवितव्य या निवडणुकीवर अवलंबून असल्यामुळे सध्याच्या निवडणुकीच्या चुकीच्या पद्धतीबाबत गावकऱ्यांना समज देवून व भविष्यातील संपूर्ण जीवनाची भिस्त निवडणुकीवर कशी आधारीत आहे हे पटवून देऊन विनागोंधळ करता किंवा कुठल्याही अमीशाला बळी न पडता निवडणुकीत मतदान करावे. या विषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात—

**जीवनाची जबाबादारी। किती आहे निवडणुकीपरि।**
**हे पटवोनि निवडणूक खरी। कारवी न गोंधळता।।**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामीण मतदानाच्या निवडणूकीत कोणाला निवडून द्यावे हा विचार जरी गावासाठी मर्यादित असला तरी त्यापलीकडे तो प्रांतासाठी, राष्ट्रासाठी अन् एकूणच मानवाधिकाराला सुद्धा लावता येतो. त्यामुळेच तर,

**गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा**
**गावची भंगता अवदशा। येई देशा।।**

असे राष्ट्रसंतांने ग्रामगीतेत स्पष्टपणे सांगितले आहे आणि त्यांचा मतदानाच्या संदर्भातला हाच विचार गावपातळीपासून राष्ट्रापर्यंत नेण्यासारखा आहे. कल्याणकारी राष्ट्र त्यातूनच निर्माण होईल. ग्राममतदानाच्या संदर्भात ते म्हणतात,

**कोण गावासाठी झटे। कोण उठतो रोज पहाटे?।।**
**घेऊनि हातामाजी खराटे। झाडतो कोण?।।**

राष्ट्रसंतांचा ग्रामस्वच्छतेचा हा विचार ग्राम आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. वैराग्यमूर्ती गाडगेबाबाने हाच मंत्र गावा गावातील लोकांना दिला. जे गाव स्वच्छ असेल तेथील ग्रामनाथांची मने स्वच्छ होतात व त्यात चांगले विचार येऊ शकतात. आजच्या काळात पुढारी हातात खराटा घेताना दिसत नसला तरी गाव विकासाचा ध्यास त्यांच्या अंत:करणात असणे आवश्यक आहे.

'मतदान कुणला करावे?' या संदर्भात ज्या ओव्या राष्ट्रसंतांनी लिहिल्या आहेत त्या आजच्या काळाला लागू होणाऱ्या आहेत. इतकेच नव्हे तर आजच्या काळाची ही खरी गरज आहे.

**समारोप —**

मानवाधिकार टिकवून ठेवण्यासाठी लोकशाही शाबूत ठेवणे तितकेच गरजेचे आहे. लोकशाही कोलमडल्यास मानवाधिकारावर सुद्धा गदा आल्याशिवाय काही राहणार नाही. म्हणून लोकशाही अबादित राहावी आणि त्यात कुणावरही अन्याय होवू नये यासाठीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज त्यासंबंधी आपले मत व्यक्त करतांना म्हणतात—

**लोकशाही म्हणजे लोकांचे हित। लोकांकडूनि व्हावे हातोहात।**
**सर्व मालक म्हणेनि सत्य। जबाबदारी ओळखावी।।**

**तीच म्हणावी लोकशाही। जेथे कोणी कामचुकार नाही।**
**सेवातत्पर सर्व उत्साही। न्यायी जन।।**
**लोकशाहीत जो सत्ताधारी। तो मालक नव्हेचि निर्धारी।**
**लोकसेवेचा कारभारी। जबाबदारी ही त्याची।**

लोकशाहीत जो सत्ताधारी असतो तो लोकसेवेचा कारभारी असायला पाहिजे. लोकांच्या हिताचे कार्य करणे हीच त्याची जबाबदारी असते. अशा लोकशाहीत कुणीही जर मालक होत असेल तर लोकशाही धोक्यात येईल अन् त्यामुळे मानवाच्या अधिकारावर सुद्धा गदा येऊ शकते. हे असे होऊ नये म्हणून लोकांचे हित जपणे गरजेचे आहे. या संदर्भात तुकारामदादा गीताचार्य म्हणतात की, ''लोकशाहीत आमदार, खासदार, जिल्हा परिषदेचे सदस्य, ग्राम पंचायतचे सदस्य, सरपंच हे जनतेचे मालक नसून ते सेवक, दिवाणजी किंवा मुनीम आहेत.'' आणि हे सत्य आहे. आज लोकशाही पद्धतीने निवडून आलेलेल सत्ताधारी स्वत:ला सर्वश्रेष्ठ मालक समजू लागल्यास किंवा 'हम करे सो कायदा' करू लागल्यामुळे भारतीय लोकशाही आणि सोबतच मानवाधिकार सुद्धा धोक्यात येऊ शकते. असे होऊ नये यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता या ग्रंथाची निर्मिती केली आहे. त्यामुळेच तर ते म्हणतात—

**गावाची करावी आदर्श व्यवस्था। म्हणोनि कथिली 'ग्रामगीता'।**
**ग्रामपासोनि पुढे वाढता। विश्वव्यापी व्हावे।।**

गावासोबतच राष्ट्राचा विकास अन् राष्ट्रासोबतच सर्वांना मानवाधिकार प्राप्त व्हावे हीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची विश्वव्यापी अशी आंतरिक ईच्छा होती.

**निष्कर्ष —**

**१) समाजकंटक व निवडणूक —**

भारतात लोकशाही आहे. गावागावांत निवडणुका होतात. आपण निवडून यावे म्हणून काही स्वार्थी लोक गावातील वातावरण दूषित करतात. यात काही विद्वान तर काही श्रीमंत असतात. काहींचे राजदरबारात वजन असते. लोकांनी आपल्या पंखाखाली राहावे व आपण त्यांचे पुढारी बनावे म्हणून हे लोक दुर्मिळ सन्मान मिळवून देतात. कुणला प्रलोभन दाखवताता, कुणी गुंडांना प्रोत्साहन देतात आणि या रीतीने लोकांचे प्रेम संपादन करतात. भोळी जनता त्यांच्या जाळयात फसते. सज्जनांनी केलेले चांगले कार्य उद्ध्वस्त होते. एवढेच नव्हे तर जे जे वाईट झाले ते ते सज्जनांच्या माथी मारतात. त्यांच्या प्रलोभनामुळे गावातील लोक भ्रमिष्ट होतात. तशातच निवडणूक येते. कुणी जातिवादावर मते मागतात, कुणी दुसऱ्याची कुचेष्टा करून मत मागतात, कुणी हवी तशी वचने देतात, कुणी मेजवान्या देतात, तर कुणी मतदारांना मोटारीतून घालून आणतात, कुणी दारू पाजतात आणि अशा रीतीने गुंडागिरीने निवडून येतात.

**२) मतदान कुणाला करावे?—**

सज्जन असला तरी प्रत्येकजण स्वत:ला शहाणा समजतो. यामुळे गावाचे पुढारीपण कुणाला द्यावे याचा पेच पडतो; पण जो प्रामाणिक सत्कार्य करतो, ज्याच्यात नैतिक वजन अधिक असते तोच पुढारी बनण्याला अधिक योग्य असतो. खरे तर आजची निवडणुकीची प्रथा हीच मुळी सदोष आहे. पुढारीपण हे गावाची सेवा करण्यासाठी असते. गावासाठी कोण झटतो, कुणाची राहणी साधी आहे, कुणाला पक्षपात आवडत नाही हे सारे लक्षात घेऊन अशा माणसाला आपला पुढारी बनवावे. पक्ष पाहून मत देऊ नये. नातीगोती पाहून मत देऊ नये. जातपात पाहून मत देऊ नये. गरिबांचे काम करीत नाही त्याला मत देऊ नये. श्रीमंत—गरीब पाहून त्याला मत देऊ नये. फक्त चारित्र्य व सेवा पाहून मत द्यावे. एक—एक मत लाख मोलाचे असते, हे लक्षात ठेवावे. हे तत्त्व लोकांना पटवून द्यावे. असे केले तर धुरळा तो उडवणाऱ्याच्याच डोळयांत जाईल व गाव सुखी होईल. व पर्यायाने राष्ट्र सुखी होईल. अशाप्रकारे मताधिकार आणि मानवाधिकारासंबंधी राष्ट्रसंत

तुकडोजी महाराजाने आपले विचार व्यक्त केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


- **ग्रामगीता— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**
  ;१द्ध श्री गुरूदेव आत्मानुसंधान भू—वैकुंठ
  ;२द्ध टेकडी(अड्याळ), ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर
- **गद्य ग्रामगीता — तुकारामदादा गीताचार्य**
  ;१द्ध श्री गुरूदेव आत्मानुसंधान भू—वैकुंठ
  ;२द्ध टेकडी(अड्याळ), ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर
  ;३द्ध प्रथमावृत्ती — २४ ऑक्टोबर २०१३
- **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य सुगंध**
  ;१द्ध संवाद — डॉ. प्रमोद मुनघाटे
  ;२द्ध वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वैचारिक वाङमय प्रकाशन समिती
  ;३द्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
  ;४द्ध प्रथमावृत्ती — ४ ऑगस्ट २०२०
- **वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता**
  ;१द्ध साहित्य प्रकाशन समिती
  ;२द्ध गुरूदेवनगर, गुरूकुंज आश्रम, ता. तिवसा, जि. अमरावती (महाराष्ट्र)
  ;३द्ध तिसावी आवृत्ती — १२ मार्च २०१७